Navrashtra :

# नवराष्ट्र

Ratnagiri-Sindhudurg | 04 September 2026 | Page 2

### सामाजिक उपक्रम : फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनकडून पुढाकार

# क्षय रुग्णांना पोषण आहार कीटवाटप

▸ रत्नागिरी, (वा.) जिल्हा क्षयरोग केंद्र, रत्नागिरी यांच्या सहकार्याने फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकारातून 'निक्षय मित्र' उपक्रमांतर्गत उपचाराखालील क्षयरुग्णांना पोषण आहार कीटचे वाटप करण्यात आले. मुकुल माधव फाउंडेशनच्या संस्थापक रितू प्रकाश छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. आरोग्य क्षेत्राला विशेष प्राधान्य देत फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू आणि वंचित घटकांपर्यंत आरोग्य तपासणी, वैद्यकीय उपचार, पोषण सहाय्य, आरोग्यविषयक जनजागृती, आवश्यक आरोग्य सुविधा पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. क्षयरोग निर्मूलनाच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला हातभार लावण्यासाठी मुकुल माधव फाउंडेशनतर्फे देशातील विविध भागांमध्ये उपचाराखालील क्षयरुग्णांना पोषण आहार किटचा आधार देण्यात येत आहे.



## औषधोपचारासोबत उपचार प्रक्रियेला मिळते बळ

क्षयरोगाच्या उपचारादरम्यान औषधोपचारासोबत योग्य आणि पौष्टिक आहार मिळणे अत्यंत आवश्यक असते. ही गरज लक्षात घेऊन रुग्णांना उपचाराच्या कालावधीत आवश्यक पोषण मिळावे आणि त्यांच्या उपचार प्रक्रियेला बळ मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे सी एस आर अधिकारी शामराव निंबाळकर यांच्या उपस्थितीत पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. तसेच जिल्हास्तरावरून श्रीकांत सावंत, प्राथमिक आरोग्य केंद्र ओणी व धारतळे येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, ग्रामीण रुग्णालय राजापूर व लांजा येथील वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक व कर्मचारी तसेच उपचाराखालील क्षयरुग्ण उपस्थित होते.

## ६०० क्षयरुग्णांसाठी लाभ

सन २०२२ पासून रत्नागिरी जिल्ह्यात फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या माध्यमातून उपचाराखालील क्षयरुग्णांना दरमहा पोषण आहार किट उपलब्ध करून देण्यात येत आहे. यावर्षीही हा उपक्रम सातत्याने सुरू असून, दरमहा ६०० क्षयरुग्णांना पोषण आहार कीटचा लाभ दिला जात आहे. याच उपक्रमांतर्गत राजापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र ओणी, प्राथमिक आरोग्य केंद्र धारतळे, ग्रामीण रुग्णालय राजापूर तसेच लांजा येथील उपचाराखालील क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. मुकुल माधव फाउंडेशनचे आरोग्यविषयक कार्य केवळ उपचारांपुरते मर्यादित नसून आरोग्य तपासणी, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, पोषण, आरोग्य जनजागृती, वैद्यकीय सहाय्य आणि गरजू रुग्णांना आवश्यक सहकार्य अशा विविध स्तरांवर सुरू आहे.